नाशिक
दि.२०/३/२०१९

# प्रेसनोट

**आलोसे अजित शिवाजीराव खकाळे, उपकोषागार अधिकारी, वर्ग २, उपकोषागार कार्यालय सिन्नर, ता.सिन्नर, जि.नाशिक यांना ३,८००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना अटक**

---

यातील तक्रारदार हे शासकीय आदिवासी मुलींचे वसतिगृह सिन्नर येथे भोजन पुरवठादार असून त्यांचे भोजन पुरवठयाचे गृहपाल यांनी सादर केलेले ५,७७,०००/–रुपयाचे बिल पारित करण्यासाठी १ % प्रमाणे ५,८००/–रुपये लाचेची मागणी आलोसे अजित शिवाजीराव खकाळे, उपकोषागार अधिकारी, वर्ग २, उपकोषागार कार्यालय सिन्नर, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे करुन त्यापैकी २०००/–रुपये दि. १८/३/२०१९ रोजी घेतलेले असून उर्वरित ३८००/–रुपये लाचेची मागणी दि.२०.३.२०१८ रोजी आलोसे अजित शिवाजीराव खकाळे, उपकोषागार अधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडे केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक नाशिक विभाग कार्यालयात तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन आज दिनांक दि.२०/३/२०१९ रोजी ला.प्र.वि.नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे अजित शिवाजीराव खकाळे, उपकोषागार अधिकारी, वर्ग २, उपकोषागार कार्यालय सिन्नर, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे उर्वरित ३८००/–रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम सिन्नर उपकोषागार कार्यालयातील उपकोषागार अधिकारी यांचे कक्षात, स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **लॅंडलाईन ते लॅंडलाईन व मोबाईल ते लॅंडलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | **टोल फ्री नंबर** |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३–२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१–२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२–२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४–२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७–२२३५४७७ | **१०६४** |

**( विश्वजीत जाधव )**
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक
विभाग,नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता